# मुले कशी शिकतील?

टि.व्हीवर 'ॲनिमल प्लॅनेट' नावाच्या चॅनेलवर एक 'पेटस्टार' नावाचा कार्यक्रम लागतो. अनेक कुत्री-मांजरी, त्यांना शिकवून तयार केलेली असतात. त्यांचे मालक त्यांच्या 'शिकण्या'चे फलित दाखवणारे खेळ करून दाखवतात. परवा त्यातील एका कुत्र्याने त्याला परीक्षकांनी सांगितलेली गणिते सोडवून दाखविली. तेथे एक नऊआकडे छापलेले बोर्ड्स एका वर्तुळात वेडेवाकडे लावून ठेवले होते. एका परीक्षकाने गणित घातलेः

३+२= ? कुत्र्याने त्या आकडयांच्या भोवती हिंडून बरोबर उत्तराचा ५ बोर्ड तोंडात धरून आणला. नंतर असेच ६+९ हेही गणित सोडवले. कुत्र्याच्या मालकाने जरा कठीण गणित घालण्याची विनंती तिसऱ्या परीक्षकाला केली. त्याने ६-३ असे गणित घातले आणि कुत्र्याने 'तीन' हे उत्तर शोधून काढले.

कुत्रासुध्दा बेरजा-वजाबाक्या नेमकेपणाने करू शकतो. पण अलीकडे घेतलेल्या महाराष्ट्रातील सर्वेक्षणातून आढळले, की पहिली ते सातवीतील अनेक मुले इतकी वर्षे शाळांमधून घालवूनही लेखन - वाचन-गणन, करू शकत नाही.

अर्थातच, या दोन्ही शंका खऱ्या नाहीत. प्राथमिक शाळां मधील हजारो मुलांना अनेक वर्षे शाळांतून जाऊनही लिहिता - वाचता येत नसेल तर ती विलक्षण लाजिरवाणी गोष्ट आहे. त्याची लाज शिक्षकांना वाटली पाहिजे. शाळांचा दर्जा सुधारण्याची जबाबदारी असणाऱ्या केंद्रप्रमुखांना आणि शिक्षणसंबंधित सर्व अधिकाऱ्यांना वाटली पाहिजे; आणि एक संस्कृत समाज म्हणून आपल्या सर्वांनाच लाज वाटली पाहिजे.

लाज आणखी एक गोष्टीविषयी वाटली पाहिजे. सामान्यतः लिहिता-वाचता येत नसेल तर दोष सर्वस्वी त्या विद्यार्थ्यांलाच देण्याची प्रथा सार्वत्रिक आहे. शिक्षक-केंद्रप्रमुख नि शासकीय अधिकाऱ्यांच्या सोयीची ही प्रथा आहे. कारण, उपाययोजनेचे बोट त्यांना मुलांकडेच दाखवता येते. मुलांना आणखीन 'अभ्यासाला लावता येते. दोष पालकांना नि त्यांच्या आर्थिक -सामाजिक परिस्थितीलाही दिला जातो. म्हणजे संबंधित शालेय -प्रौढांना आपली जबाबदारी टाळता येते. अशी जबाबदारी आपण टाळतो आहोत याची लाज त्यांनी वाटून घेतली पाहिजे.

वास्तविक, शाळातील कित्येक मुलांना योग्य वेळेवर लिहिता -वाचता येत नाही, हा सामाजिक शैक्षणिक रोग बराच जुना आहे. पन्नास वर्षांपूर्वी माझ्या लहानपणीसुध्दा पहिली-दुसरीत लिहिता-वाचता न येणारी मुले असायचीच. मात्र त्या काळी अशी मुले परीक्षांमध्ये दोन -दोन, तीन वर्षे नापास होत असत. आणि मग शाळाही सोडून जात असत. गळती'च्या प्रश्नाचा फारसा बाऊकेला जात नसल्यामुळे, तिसरी - चौथी - पाचवी - सहावीत वगैरे अशी लिहिता - वाचता न येणारी मुले नसतच. त्यामुळे आमच्या काळी' वगैरे मुले 'ढ' नसत किंवा शिक्षक चांगलेच असत, असे मानण्याचेही फारसे कारण नाही. त्याम ळे आजच्या शाळांमधून ठळकपणे दिसून येणारा

लिहिता - वाचता न येण्याचा रोग त्याकाळी नव्हता असे नाही, तर तो पूर्णतःशाळेबाहेरच ढकलला गेलेला असे. पण अदृश्य रूपाने का होईना, हा प्रश्न अस्तित्त्वात होताच.

गेले शतकभर असलेल्या या रोगाचे आपण पुरते निदानच करू शकलेला नाही. त्यामुळे आज जे काही उपाय त्यासाठी आपण योजू पाहात आहोत त्यांचा तात्पुरता उपयोग झाल्याचा भास कदाचित आपल्याला होईल; पण, तो प्रश्न समूळ नाहीसा होणार नाही. प्रश्नाचे मूळ आपण शोधतच नाही. आणि ते सापडल्याशिवाय समूळ नष्ट करताही येणार नाही.

बरीचशी मुले चांगली शिकत नाहीत, त्यांना तिसरी -चौथीत जाऊनही लिहिता -वाचता येत नाही. त्यांना शिकण्यात रसच वाटत नाही. या परिस्थितीशी गेले शतक भर आपण सामना करीत असू, आणि तरीही तो आटोक्यात येत नसेल, तर त्या प्रश्नाकडे पाहण्याची आपली दृष्टीच आपण बदलली पाहिजे. आज च्या शिक्षणामागचे शैक्षणिक तत्त्वज्ञानच आपण टाकून दिले पाहिजे आणि त्या तत्त्वज्ञानाच्या आधारे चाललेल्या शाळांच्या वर्गातील शिक्षणपध्दतींना आणि त्याबाबतच्या शिक्षकांच्या प्रशिक्षणाला आपण धीटपणे सोडचिठ्ठी दिली पाहिजे. विसाव्या शतकभरातले हे शिक्षण, सर्वच मुलांना शिकू देणारे शिक्षण नव्ह ते, हे सत्य आपण स्वीकारले पाहिजे. ते शिक्षण, विषमतापूर्ण शिक्षण होते. ते काहींच्या पदरात यश टाकणारे । आणि अनेकांना अपयशाचे धनी करणारे असेच होते, म्हणून ते आजच्या लोकशाही तत्त्वज्ञानाशीही विसंगत असेच होते. ते, त्यामागील शतकांतील सरंजामशाही विषम संस्कृतींना सा जेसे असे शिक्षण होते, असे फार तर आपल्याला म्हणता येईल.

आपल्याला असे शिक्षण हवे आहे की, जे सर्वच मुलांना शिकू देणारे, सर्वांनाच समानतेचे शिक्षणात सामावून घेणारे, असे 'समानतावादी शिक्षण' ठरेल. आपल्याला शिक्षणाचा असा ढाचा हवा आहे. की जो सर्वच मुलांच्या नैसर्गिक अशा शिकण्याच्या क्षमतांना पुरेपूर वाव देईल, त्यांना आपल्या कलाने नि आपल्या दिलाने शिकू देईल. आणि आपल्याला अशा शिक्षणाची आस आहे, की जे मुलांना शिकू देणारे असेल पण शिकवणारे नसेल. म्हणजेच आपल्याला शाळांचेही स्वरूप बदलायला हवे, शाळांची व्याख्याही बदलायला हवी. मुलांसाठी, त्यांना शिकविणाऱ्या, शाळा नकोत. मुलांना शिकू देणाऱ्या शाळा हव्यात. जेथे शिकविण्याचा प्रयत्न केला जातो, हट्ट धरला जातो, त्यासाठी बळजबरी केली जाते, अशा शाळा

आपल्याला नकोत, तर जेथे मुलांना आपणहून शिकण्याच्या, स्वयंशिक्षणाच्या - संधी मिळतात, अशा शाळा हव्या आहेत. साहजिकच आता आपल्याला मुलांना शिकविण्यासाठी आणि शिकविणारे शिक्षक नकोत तर, मुलांना शिकण्यासाठी कल्पकतेने वातावरण निर्माण करणारे आणि विविधांगी संधी पुरविणारे असे

शिक्षक हवे आहेत. 'संधी पुरवते ती शाळा' असेल, तर अशा 'संधी निर्माण करतो तो शिक्षक' अशी 'शिक्षकांची नव्याने व्याख्या करावी लागेल,' शिकवतो तो शिक्षक ' ही मर्यादित वकुबाची आणि शिक्षकाला केवळ इकडचे तिकडे देणारा असा हमाल बनवणारी व्याख्या द्यावी लागेल .

अशा दिशेने वै चारिक परिवर्तन करून आपल्या आजच्या शैक्षणिक प्रश्नांवरची उत्तरे सापडू शकतील. आणि मग, सात वर्षे 'शिकवून' इंग्रजी येत नाही म्हणून पहिलीपासून इंग्रजी सुरू करून अकरा वर्षे शिकवावे, म्हणजे ते येईल, असे मानणे किंवा वर्षभर मुलांना रोज पाच तासांचा रतीब घालून लिहिता वा चता येत नाही, म्हणून आता दोन महिने रोज नऊ - साडेनऊतास त्यांना शिकवावे, म्हणजे ती शिकतील । असे मानणे, या निरर्थक आणि म्हणून निष्फ ळ अशा विचार चौकटीतून बाहेर पडू या. म्हणजे मग नवविचारांची नक्षत्रे आपल्या सहाय्यार्थ धावून येतील. आपल्या प्रश्नांची चुटकीसरशी सोड वणूक करतील.

अनेक वर्षे शिक विण्याचा अट्टाहास धरूनही मुले शिकत नसतील तर तो विद्यार्थ्यांच्या वकुबाचा किंवा शिक्षकांच्या कौशल्याचा दोष न मानता, 'शिकवणे' या पूर्वापार धरून ठेवलेल्या संकल्पनेचा दोष आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आपल्या वैचारिक परिवर्तनाची सुरूवात येथून होते. आपल्या विचाराचे परिणामच येथे बदलते, हे आपल्या ध्यानात येईल. असेच आणखी एक उदाहरण घेता येईल. बराच काळ आपण, शाळाशाळांतून विद्यार्थ्यांचा दर्जा सुधारण्यासाठी स्पर्धा घेत आलो आहोत.

परंतु स्पर्धांमुळे सर्व मुलांचा सदाकाळचा दर्जा सुधारत नाही, हे भल्याभल्यांच्या लक्षात येऊलागले आहे. पण, बदल केला जातो तो स्पर्धांच्या स्वरूपात वा प्रकारांत. त्यानेही काही साधत नाही. अशावेळी आपण स्पर्धांवरच आणखी वेगळया अंगांनी विचार करण्यापेक्षा असा विचार करून पाहावा की, दर्जात्मक सुधारणा घडविण्याची ताकदच स्पर्धेच्या संकल्पन त नसेल का? स्पर्धा हीच एक दोष पूर्ण संकल्पना असेल का ? 'स्पर्धा' आणि दर्जात्मक सुधारणा या दोन चलांमध्ये परस्परसंबंध (जीशश्ररींळेप लशींशशप हिश रीिंळरलश्रशी) कदाचित नसेल का? आणि मग ‘स्पर्धा' टाकून देण्याच्या विचारापर्यंतही आपण आपली क्रांतीकारक पावले टाकत जाऊन, विद्यार्थ्यांचा अनाठायी श्रमांतून सुटकाही करू शकू कदाचित!

थोडक्यात असे, की आपण 'शिकवणे' यांवरचे लक्ष काढन घेऊन ते 'शिकणे' यावर केंद्रित करू लागलो, की परिवर्तनाची पुढची वाटच आपल्या दृष्टीपथात येऊ लागते. आणि हीच वाट नेमकी कोलंबसला हव्या हा त्या त्या हिंदुस्थानला घेऊन जाते, हेही ध्यानात येते.

पण, इथे एक फार मोठी अडचण आहे. शिक्षणक्षेत्रातील चिकित्सक लोक, काहीतरी बळकट असा सैध्दांतिक पाया असल्याशिवाय व्यवहारात बदल करायला धजत नाहीत. एके काळी, 'शिकवणे' या संकल्पनेला वर्तनवादी मानसशास्त्राने पक्का शास्त्रीय - सैध्दांतिक - पाया पुरवला होता. आजचा आपला साराच शिक्षण - व्यवहार याच सैध्दांतिक पायावर उभा ठाकलेला आहे.

आणि जोवर हा पाया खचला असल्याचे कोणी दाखवून देत नाही, आणि त्याहीपेक्षा, नवा बळकट सैध्दांतिक पाया जोवर पुरविला जात नाही, तोवर व्यवहाराला नवे वळण द्यायला शिक्षणशास्त्री, तयार होणार नाहीत. त्यामुळे त्यांच्याही समाधानाची ही बाब वगळून आपल्याला पुढे जाता येणार नाही...

माणसाची शिकण्याची प्रक्रिया ही मानसपातळीवर घडून येणारी प्रक्रिया असल्यामुळे, शिक्षणव्यवहार हा आपला आधार प्रामुख्याने मानसशास्त्रात शोधत असतो. शतकापूर्वी ज्या शिक्षणव्यवहाराने आपले बस्तान बसविले ते तत्कालीन मानसशास्त्रातील संशोधनांवर बेतलेल्या अशा सिध्दान्तावरच होते. तत्कालीन मानसशास्ज्ञांना माणसांवर प्रयोग करणे शक्य झाले नव्हते. त्यामुळे त्यांनी माणसाळलेल्या अशा कुत्री, मांजरे, कबुतरे अशा प्राण्यांवर आपले प्रयोग करून, त्यांच्या आणि म्हणून पर्यायाने माणसाच्या - वर्तनात बदल घडवून आणता येतो, अशा प्रकारचा शोध लावला. पावलोव्ह, थॉर्नडाईक, स्कीनर, वॅटसन वगैरे प्रभृतींनी मांडलेल्या निष्कर्षांचा एकत्रित आशय असा, की काहीतरी बाहय उत्तेजन देऊन । (शिक्षा,बक्षिसे इत्यादी) माणसाच्या वर्तनात बदल घडवून आणता येतो, त्या वर्तनाची पुनरावृत्ती होऊ शकते, पुनरावृत्तीने पक्केपणा प्राप्त होतो. अशी तत्त्वे, तसेच 'प्रश्न सोडविण्याची क्षमता प्राप्त करणे म्हणजेच शिकणे' होय, आणि या प्रक्रियेतून घडवून आणावयाचा असा 'वर्तनातील अपेक्षित बदल म्हणजे शिक्षण' होय, अशा व्याख्या शिक्षणक्षेत्रात रूढ झाल्या. आजही हेच शतकापूर्वीचे वर्तनवादी शास्त्र शिक्षकलोक आपल्या प्रशिक्षणांतून शिकतात, त्या आधारेच मुलांना शिकवतात', आणि यातून मुले शिकली पाहिजेत अशी अपेक्षा, करतात. शिक्षणाला आधारभूत असलेले मानसशास्त्रच आता बदलले आहे, बरेच पुढे गेले आहे. एके काळ 'ी, माणसाच्या मानसपातळीवर काय घडते आहे याचा अंदाज घेण्यासाठी बाहयवर्तनावर लक्ष केंद्रित करावे लागले होते. त्याचप्रमाणे, 'वर्तना'विषयीची जाण संपादन करण्यासाठी पंचवीस वर्षांतील तंत्रज्ञानातील प्रगतीने मानवी मेंदूचे, तो कार्यरत असतानाच फोटो घेणे शक्य झाले. त्यामुळे, फोटो तंत्राने ज्याप्रमाणे चंद्रावरची, मंगळावरची आणि अन्य ग्रहांवरची परिस्थिती आकलन करता येऊ लागली आहे, त्याचप्रमाणे मेडिकल फोटो इमेजिंगच्या तंत्राने मेंदूचे स्वरूप आणि कार्य आता दृष्टीपथात आले आहे. त्यामुळे, मानसशास्त्र आता एकटे राहिलेले नाही, त्याला मज्जाशास्त्राची जोड मिळून, मज्जामानसशास्त्राची एक नवपरिणत शाखा शिक्षणा'चे नवे आकलन द्यायला सिध्द झाली आहे.

मानवी मेंदूला उत्क्रांतीने आजची परिणत अवस्था प्राप्त झाली आणि एकावर एक अशी मेंदूची तीन आवरणे( किंवा तीन मेंदू )कशी निर्माण झाली याची वर्णन पॉल मॅक्लीन यांनी दिले आहे. जीवाच्या उत्पत्तीपासून त्यांचे रूपांतर सरपटणाऱ्या (साप, सुसर इत्यादी ) प्राण्यांमध्ये झाले तेव्हा त्यांना जैविक क्रिया करणारा जो मेंदू प्राप्त झाला, तो अर्थातच माणसातही आहे.

माणसाच्या या मेंदूला 'सरपट मेंदू' (रेप्टिलियन ब्रेन ) असे म्हणतात. अवि कसित अशा सस्तन प्राण्यांना असतो तो म्हणजे माणसाचा भावनिक मेंदू (ओल्ड मॅमिलियन) होय. आणि विकसित अशा सस्तन प्राण्यांमध्ये जो मेंदू

तयार होत गेला, तो म्हणजे नवबाहयक(नीओकॉर्टेक्स) होय. स्थूलमानाने सांगावयाचे तर मानवामधील तीन प्रकारची कार्ये या तीन मेंदूमध्ये वाटून दिलेली आहेत. निव्वळ जगण्यासाठी आवश्यक त्या भूक, तहान, संभोग अशा शरीर क्रियांचा प्रणेता मेंदू हा सर्वच सजीवांना प्राप्त झालेला, सरपट मेंदू होय.

ओल्ड मॅमेलियन किंवा लिंबिक लोब या मेंदूत मानवी भावनांचे अधिष्ठान असते. आणि नीओकॉर्टेक्स म्हणजे नवबाहयाक यामध्ये मानवाच्या बौध्दिक नि कलात्मक क्रियांची केंद्रे असतात.

पॉल मॅक्लीन यांची ही तीन मेंदूची कार्यविभागणी, आपल्याला माणसाच्या 'वर्तना' विषयी, शिकण्या 'विषयी नवीन दृष्टी प्राप्त करून देते. त्याचबरोबर ती हेही दाखवून देते, की पूर्वीच्या मानसशास्त्रात केलेले प्राण्यांवरच प्रयोग व त्यातील निष्कर्ष माणसाला लागू केले गेले असले, तरीही ते आपल्याला चुकीच्या दिशेने घेऊन गेले आहेत. कारण असे, की मानवाचे

बौध्दिक विकासाचे अधिष्ठान असणारा जो मेंदू (नवबाहयक नीओकॉर्टेक्स ) तो मुळी प्राण्यांना नसतोच. त्यामुळे, साहजिकच नवबाहयकाच्य । कार्याची जी जाण आपल्याला हवी आहे, ती तत्कालीन मानसशास्त्राला देता येणारच नव्हती. प्राण्यांच्या शिकण्याचे नि 'वर्तना'चे निष्कर्ष माणसाच्या बौध्दिक कार्याला लागू पडणारे नव्हते. उलट माणूस 'शिकतो' कसा ते खूपसे स्पष्ट केले आहे. आणि ते वर्तनवादी मानसशास्त्राने सांगितले तसे अर्थातच नाही. त्यामुळे वर्तनवादी मानसशास्त्राचा शिक्षणव्यवहारांना लाभलेला पायाच खचून जातो. परंतु त्याने भयभीत होण्याची गरज नाही. कारण, शिक्षणशास्त्राला बळकट सैध्दान्तिक पाया मेंद संशोधनाने । आणि मानसशास्त्रीय संशोधनाने आपल्याला उपलब्ध करून दिला आहे. हा पाया रचनावादी सिध्दान्ताचा.

बऱ्याच विद्यार्थ्यांना वर्षानुवर्षे शिकवूनही लेखन - वाचन - गणन येत नसेल तर त्याचे मूळ ज्या एका वर्तनवादी शिक्षण व्यवहारात आहे, त्याचे पूर्ण उच्चाटन केले पाहिजे; व त्याच्या जागी रचनावादी शिक्षणप्रणालीची प्रतिष्ठापना केली पाहिजे, हा शिक्षणातील परिवर्तनाचा मार्ग आहे, असे म्हणता येईल.

रचनावादी शिक्षणप्रणाली ही विकासक मानसशास्त्र व मज्जामानसशास्त्र यांवर आधारित, सर्वमान्य अशी अत्याधुनिक शिक्षणपध्दती आहे.

मूल स्वतःच शिकत असते, आपल्या ज्ञानाची रचना करीत जाते, हे या पध्दतीचे मूलतत्त्व आहे. जन्मल्यापासून आपल या कर्मेंद्रियांच्या आणि ज्ञानेंद्रियांच्या साहाय्याने, मानवी बालक, जगाची ओळख करून घेत असते, म्हणजेच शिकत असते. वयाच्या आठव्या - नवव्या वर्षापर्यंत बालकाचा मेंदू घडत असतो, आकार घेत असतो, आपल्या नैसर्गिक क्षमतांना, विस्तारत असतो.

स्वयंशिक्षणाचा अतिशय वेगाने अवलंब होण याचा हा कालावधी असतो. आपण याला 'कळीचा कालावधी' असे म्हणू या. कालावधी माणसाच्या आयुष्यातील सर्वांत महत्त्वाचा कालावधी असतो; कारण, याच कालावधीत

मेंदूक्षेत्रात दुहेरी कार्य चालू असते. एक म्हणजे, प्रत्यक्ष मेंदूतील पेशींची परस्परांशी जुळणी होत असते, म्हणजेच आयु ष्यभर वापरावयाच्या विविध क्षमता तयार होत असतात. आणि दुसरे म्हणजे, ज्या ज्या क्षमता तयार होत जातात त्यांचा भरमसाठ वापर करून बालक, त्यांना बळकट करीत असते, सबल करीत जाते. थोडक्यात, एकाच वेळी क्षमतानिर्मितीचा नि क्षमतासबलीकरणाचा हा काळ असतो.

साहजिकच या काळात मुलांना विविधांगी, विधायक आणि चालू असलेल्या कार्याला पूरक असे अनुभव मिळावे लागतात. अनुभव संख्येने नि गुणने जेवढे जास्त तेवढी बालकाची बौध्दिक वाढ निकोप होत जाते.

हे सारे लक्षात घेतले म्हणजे, या वयातील शिक्षणाचे आणखी एक तत्त्व आपल्याला मांडता येईल. हे तत्त्व आहे. 'अनुभवाधारित शिक्षणा'चे. याच्याच आधारे, अनुभवांच्या संधी पुरवते ते शिक्षण' अशी रचनाधिष्ठित शिक्षणाची नवी व्याख्याही आपल्याला बनवता येईल.

अनुभव हे मेंदूचे अन्न असते. हे अन्न दूषित असून चालत नाही. धाकाचे, भीतीचे, बळजबरीचे, माराचे, वेदनांचे, धक्क्यांचे, मो ठया आवाजांचे, दूषित हवेचे, व्यवहारातील शिस्तीचे, स्पर्धांचे, तुलनांचे, अधिक्षेपाचे, अपमानाचे, रडविणारे असे सारे अनुभव बालकाच्या मेंदूच्या निकोप वाढीत अडथळा ठरतात. मेंदू असक्षम राहतो, लहान राहता आणि बालकाचे वर्तन विकृत बनते. त्यामुळे अशा प्रकारच्या अनुभवांना 'मेंदूविरोधी अनुभव' असे म्हणता येईल.

शिक्षणाच्या क्षेत्रात निर्णय घेताना, नेहमीच, घेतलेला निर्णय हा काही भलेच घडविणारा आहे, असे मानले जाते, कारण निर्णय घेणाऱ्याचा हेतू तसा असतो. परंतु जसे डॉक्टरांनी दिलेल्या विशिष्ट औषधाला काही आनुषंगिक अनिष्ट परिणामांची (साईड इ फेक्टस्)शक्यता असते, त्याचप्रमाणे शासकांनी घेतलेल्या शैक्षणिक निर्णयालाही आनुषंगिक अनिष्ट परिणामांची शक्यता असते. मात्र ती कधीही विचारात घेतली जात नाही. किंबहुना अशी 'लाभ - नुकसान विश्लेषण' अगाऊ करण्याची शास्त्रीय पध्दतच शिक्षणक्षेत्रात अस्तित्त्वात नाही . त्यामुळे कुणीही अपघाताने मंत्री होतो आणि महाराष्ट्रात पहिलीपासून इंग्रजी सुरू करून जातो. तो जाऊन दुसरा कुणीतरी त्याची जागा घेतो नि साऱ्या महाराष्ट्राला

फुकट क्रमिक पुस्तके वाटण्याचा निर्णय घेऊन मावळतो. तेथे तिसराच कुणी येतो नि पहिलीपासून संगणकाचे शिक्षण देण्याचा विडा उचलतो. मंत्री येतात नि जातात पण आपण, क्रांतीकारक म्हणून लादलेल्या निर्णयांच्या आनुषंगिक अनिष्ट परिणामांची जबाबदारी घ्यायला हे हजर नसतात. मंत्र्यांना असे मंत्रवत् निर्णय घेण्याचे अधिकार असता कामा नयेत. शैक्षणिक निर्णयांचे परिणाम, मग ते बरे असोत वा वाईट, दिसायला दीर्घकाळ लागतो. यामुळेच त्याची अंमलबजावणी करण्यापूर्वी, ते निर्णय काही पायऱ्या घेऊन पुढे गेले पाहिजेत.

एक म्हणजे, लो कांकडून, किमानपक्षी जाणत्यांकडून, त्याची मागणी यायला हवी, मागणीची शहानिशा अशासकीय तज्ज्ञांच्या समितीकडून व्हायला हवी. तज्ज्ञांनी सुचविलेल्या बाबी जाहीर चर्चासाठी,

मतप्रदर्शनासाठी खुल्या केल्या जाव्या, त्यानंतर पुनश्च सारासार विचारांनी, तज्ज्ञसमितीने विचार करून आपला अहवाल शासनाला सादर करावा. शासनाने कायदेमंडळात त्याचा कौल मागावा आणि सरतेशवेटी प्रयोगिक स्वरूपावरच तो राबव न त्याच्या यशापयशाचा अंदाज घेऊन, सावकाशीने त्याचे सार्वत्रिकरण व्हावे. आपण लोकशाही मानत असू तर, ही पध्दती लाकशाहीस सुसंगत अशी ठरेल.

मंत्र्यांनी पदग्रहण करताच रात्री शिक्षणक्रांतीची स्वप्ने पाहायची आणि सकाळी उठून उभ्या महाराष्ट्रावरच आपला निर्णय लादायचा ही तफन ह कुमशाही पध्दत आहे. समाजाने तिला विरोध केला पाहिजे.

हल्ली शासकीय अधिकारीही असेच घाईघाईनेच निर्णय घेऊन ते शाळांवर लादताना आढळतात. अलीकडचाच निर्णय, उदाहरणार्थ पाहू या. मुलांना दोन -चार वर्षे शाळेत घालवूनही लिहिता - वाचता येत नाही या सत्याचा साक्षात्कार झाल्या नंतर तातडीने 'लेखन - वाचन हमी प्रकल्प' घिसाडघाईने हाती घेण्यात आला. जे दोन - चार वर्षांत घडून आले नाही ते दोन -चार महिन्यांत घडविण्याचा संकल्प झाला, आणि शाळांमधून एरवीच्या पाच तासांऐवजी आता आठ - नऊ तास 'अभ्यासा' ला बसवणे सुरू झाले. त्यातून शिक्षकांची आणि त्याहीपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची, परवड सुरू झाली.

याच्या मागची गृहिते फार गंभीर आहेत. एक असे, की मुले अभ्यास करीत नाहीत. त्यामुळे त्यांना चांगले दामटून अभ्यासाला बसवले पाहिजे. दुसरे असे, की लिहा - वाचायला शिकण्यासाठी दिवसाचे पाच तास आणि दोन - चार वर्षेही अप री पडतात, म्हणून आता अधिक तासांची भर घातली पाहिजे. इत्यादी. यामधून लगेच सर्वच मुलांना खाडकन् लिहिता - वाचता येऊलागेल, अशा भल्या परिणामांची अपेक्षा केली गेली.

परंतु याचे आनुषंगिक अनिष्ट परिणाम विचारात घेतले गेलेले नाहीत. काय घडेल यातून ? एक म्हणजे,

मु ले अधिकवेळ अभ्यासाला बसायचे सपशेल नाकारतील, दांडया मारतील. नाकारता न आल्यास शक्य तेवढे अभ्यास टाळतील. म्हणजे, असे, की ही मुले आणखी चार तास शिक्षकांसमोर बसतील. पण, शिकण्याचे टाळतील. कारण अभ्यासावर मन केंद्रित करता येणार नाही. आणि हेच निसर्गाला धरून आहे, नाहीतरी वर्षानुवर्षे रोज चार - पाच तास ही मुले याच शिक्षकांसमोर बसत होतीच की, मग का शिकली नाहीत ? ज्याप्रकारे मुले आजवर शिकली नाहीत, त्याचप्रकारे त्यांना पुन्हा शिकयला लावण्याचा अटाहास निरूपयोगी नाही का? नेहमीपेक्षा एक गोष्ट मात्र आता वेगळी असेल. सरका रला झटपट यश हवे असल्यामुळे या मुलांवर भरपूर बळजबरी केली जाईल; क्वचित शिक्षांचा अवलंबही

के ला जाईल. आणि नेमकी हीच गोष्ट सरकारी अपेक्षांच्या विरोधात जाईल. झटपट शिकण्यासाठी वाढती सक्ती केली जाईल आणि ही वाढती सक्तीच मुलांना शिकू देणार नाही, हा तर निसर्गनियमच आहे; कारण, हे मेंदूविरोधी शिक्षण आहे. आणखी एक अनिष्ट परिणाम घडण्याची दाट

श क्य ता आहे. मुलांनी तातडीने लिहा - वाचायला लागावे ही आता शिक्षकांची गरज होईल. परिणामतः मुलांकडून लेखन रटवून आणि वाचन पाठ करून घेतले जाईल. पुढच्या परीक्षांच्या वेळेस मुले पढवलेले वाचतील, लिहितील पण, कायमस्वरूपी लिहा वाचायला शिकणारच नाहीत. म्हणजे जे घडवायला घेतले ते घडणारच नाही!

मुलांना अनेक वर्षे शाळेत जाऊनही लिहिता -वाचता येत नाही याची कारणमीमांसा करायला हवी. मुले किती वेळ शिक्षकांसमोर बसतात हे महत्त्वाचे नाही; तेथे बसून ती शिकतात कशी, हा खरा प्रश्न आहे. शिक्षक काय नि किती शिकवतात हा प्रश्न नाही, तर विद्यार्थी काय नि कस शिकतात हा कळीचा प्रश्न आहे.

शाळांतून मुलांचे अपेक्षित शिक्षण होत नाही, याचे पहिले कारण आहे ते म्हण बसून शिकण्यात रस वाटत नाही. त्यामुळे हा रस कसा निर्माण होईल हे पाहिले पाहिजे.

दुसरे कारण असे, की शिक्षक वर्गात जे काही करतो त्यात त्याला रस वाटत नाही.. त्याला मुलांच्यात रस नसतो आणि ज्या पध्दतीने त्याला शिकवावे लागते त्यातही त्याला रसप र्ण असे काहीच वाटत नसते. शिकण्या - शिकविण्याच्या निरस पध्दतीचेच प्रशिक्षण त्याने प्राप्त केलेले असते.

तिसरे कारण असे, की विद्यार्थी आणि शिक्षक दोघेही ज्या वातावरणात एकत्र असतात ते वातावरणही निरस असते. मने उल्हा सित करणारे वातावरण, नसेल तर शिक्षणाचे कार्य कदापिही नीट होणार नाही. हाही स्वाभाविक नियम आहे. चांगल्या शिक्षणासाठी प्रसन्न वातावरणाची गरज मेंदूला भासत असते.

पण, साऱ्या शिक्षणव्यवस्थेतील हा दुर्लक्षित राहिलेला मुद्दा आहे. 'प्रसन्न वातावरणनिर्मिती ' हे रचनावादी शिक्षणाचे तिसरे तत्त्व आहे. मुले आपली आपण शिकतात, मिळणा- या विधायक अ नुभवांच्या संधींतून निवड करून ती शिकतात आणि यासाठी त्यांना प्रसन्न वातावरणाची गरज असते.

ही तत्त्वे अंगीकारून शिक्षणाची नवी वाट निर्माण करायला हवी. तात्पुरती डागडुजी करून आपली वाट सुकर होणार नाही.

❖